# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
## अग्निशमन व आणीबाणी सेवा विभाग

प्रस्तावना

सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२४ नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा)अधिनियम २०२३ हा कायदा तयार करण्यात आलेला असुन माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ११ मे २०२३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक २००९ नुसार दि. ३० मे, २०२३ हा दिवस अंमलबजावणी करिता निश्चित करण्यात आलेला आहे.

सुधारित अधिनियम,२०२३ मधील सर्व तरतूदीचे अनुपालन करण्यासाठी सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणे अनिवार्य असल्याने त्यास मा.अति.आयुक्त, मा. उपआयुक्त (मुख्या.) मुख्य लेखापरिक्षक तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास दिनांक ०३/०७/२०२३ रोजी पुर्वमान्यता दिलेली आहे.

**ठराव क्र.** २३१ **दिनांक-** १३/०७/२०२३

सन २०२३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-२४ नुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मध्ये सुधारणा करुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा)अधिनियम २०२३ हा कायदा तयार करण्यात आलेला असुन माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ११ मे २०२३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला आहे. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्रमांक २००९ नुसार दि. ३० मे, २०२३ हा दिवस अंमलबजावणी करिता निश्चित करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/नवि-१४, दि ०९ नोव्हेंबर, २०२० अन्वये महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: सन २०२० चा महाराष्ट्र अतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) मधील तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) अधिनियम २०२३ या कायद्यामधील सर्व तरतुदीसह पृष्ठे क्रं.१ ते २६ ची अंमलबजावणी दि.३० मे,२०२३ पासुन पुर्व लक्षी प्रभावाने करण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
**प्रशासक**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी**

o/c